मी लांब केसं ,लाल पोशाखात इतक्या सुंदर अवस्थेत प्रेषित मुहम्मद [अल्लाह ची सलामती असो]

हजरत बरा रजिअल्लाहु अनहु द्वारा निवेदन आहे की: मी लांब केसं ,लाल पोशाखात इतक्या सुंदर अवस्थेत प्रेषित मुहम्मद [अल्लाह ची सलामती असो]पेक्षा देखणा माणुस बघीतला
नाही, त्यांचे केसं लांब व खांद्याला पोहोचु पाहत होती, त्यांचे दोन्ही खांद्याच्या मधात अंतर होतं, ते ना फार उंच ना फार ठेंगणे होते. [صحيح] [متفق عليه]

सदर हदिस मधे बराअ बिन आजीब रजिअल्लाहु अनहु प्रेषितांचं असं वर्णन सादर करत आहेत,ज्यात ते प्रेषित मुहम्मद सल्लल्लाहु अलैही व सल्लमांचं सौंदर्य व देखणेपणा चं वर्णन करत आहेत, त्यांचं आवर्जुन सांगणं आहे की, त्यांनी मुहम्मद सल्लल्लाहु अलैही व सल्लम पेक्षा जास्त खुबसुरत सुंदर चेहरा असणारा व्यक्ती जिवनात कधी बघितला नाही, ज्याचे केसं लांब लचक कानाच्या तुऱ्या पर्यंत व लाल कपडे परिधान केले होते, आणखी प्रेषितांचं वर्णन करतांना ते म्हणतात की, प्रेषितांचे दोन्ही खांदे रुंद होते, प्रेषित मुहम्मद सल्लल्लाहु अलैही व सल्लम न फार ऊंच होते ना फार ठेंगणे होते.

http://sunnah.global/hadeeth/mr/show/2990